देशोन्नती

# उत्तर नागपुरात संविधान चित्ररथाचे जोरदार स्वागत

**नागपूर** : भारतीय संवधिान अमृत महोत्सवानिमित्त भारतीय राज्य घटनेबाबत जागरुकता तसेच घटनात्मक अधिकार व कर्तव्यांबद्दल नागरिकांमध्ये जागरुकता वाढविण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्यावतीने तयार करण्यात आलेल्या संविधान चित्ररथाचे भारतीय जनता पार्टी, उत्तर नागपुरातील कार्यकर्त्यांनी जोरदार स्वागत केले.

ढोलताशाच्या गजरात या चित्ररथाला पॉवरग्रीड चौकात संजय भेंडे, माजी आमदार गिरीश व्यास, माजी आमदार डॉ. मिलिंद माने, गणेश कानतोडे, भोजराज डुंबे व दिलीप गौर यांनी हिरवी झेंडी दाखवून रवाना केले. महिला आघाडीच्या कार्यकर्त्यांनी भारतीय संविधानाने महिलांना दिलेल्या अधिकारांचे फलक हाती घेवून व पुष्प वर्षाव करून चित्ररथाचे स्वागत केले. यावेळी 'भारतीय संविधान चिरायु होवो', 'भारतीय संविधानाचे रक्षण करणे हा आमचा जन्मसिध्द अधिकार आहे', अशा घोषणा दिल्या. माजी आमदार डॉ. मिलिंद माने यांनी याप्रसंगी भारतीय संविधानाच्या शंभर प्रती नागरिकांना



विनामूल्य वितरित केल्या. हा संविधान चित्ररथ सुगतनगर, तथागत चौक, जरीपटका पोलिस ठाणे चौक, भीम चौक, नारा रोड, जरीपटका, जिंजर मॉल चौक, बारा खोली, इंदोरा चौक, दहा नंबर पूल या मार्गाने जात कडबी चौक येथे थांबविण्यात आला.

याप्रसंगी डॉ. सरिता माने, सतिश सिरसवान, प्रभाकर येवले, नेताजी गजभिये, संजय भगत, संजय चौधरी, आशिष मिश्रा, शंकर मेश्राम, पकज यादव, लता येरखेडे यांच्यासह अनेक प्रभाग संयोजक, वॉर्ड अध्यक्ष, माजी नगरसेवक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.